<u>प्रेसनोट</u> दि. 19/05/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून मुळशी तालुक्यातील माण सजा येथील तलाठी यांचेविरूध्द लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष वय 35 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | संतोष प्रल्हाद राणे, वय 45 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद तलाठी, सजा-माण, तालुका मुळशी, जिल्हा पुणे पत्ता रा.ठि. बी 705, गंगा ओशियन पार्क, राजस सोसायटी जवळ कात्रज, कोंढवा रोड, पुणे (वर्ग 3) |
| **सुरवातीची लाच मागणी** | 25,000/- (पंचवीस हजार रूपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | 1,25,000/- लाच मागणी केल्याचे मान्य करून 1,00,000/- स्विकारल्याचे मान्य करून उर्वरीत रू. 25,000/- (पंचवीस हजार रूपये) लाच मागणी केली. |
| **पडताळणी दिनांक** | दि. 14/05/2026 रोजी |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | रू.25,000/- (पंचवीस हजार रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 19/05/2026 रोजी 18.06 वा. |
| **ठिकाण** | माण तलाठी कार्यालय, ता.मुळशी जि.पुणे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती भारती मोरे, सहा.पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9870156586) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचे वडील मयत झाले असून त्यांचे वडिलोपार्जित जमिनीचे फेरफार वर तक्रारदार व त्यांच्या भावाचे नाव नोंद करण्यासाठी तलाठी राणे यांनी तक्रारदार यांच्याकडे 1,25,000/- रूपयाची मागणी करून त्यातील 1,00,000/- रूपये यापूर्वी स्विकारून फेरफारवर नोंद केली असून तक्रारदार यांच्याकडे उर्वरित 25 हजाराची लाच मागणी करत असले बाबत तक्रार तक्रारदार यांनी दिनांक 11/05/2026 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली होती.

वरील प्रमाणे तक्रार प्राप्त झाल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 14/05/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान तलाठी संतोष राणे यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाराकडे 1,25,000/- रूपये यापूर्वीच मागणी केल्याचे मान्य करून 1,00,000/- रूपये यापुर्वी स्वीकारल्याचे मान्य करून उर्वरित 25,000/- रूपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे झालेल्या लाच मागणीच्या अनुषंगाने दिनांक 19/05/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक तलाठी संतोष राणे यांनी 25,000/- रूपये लाच स्वीकारली असता 18:06 वा. चे सुमारास माण तलाठी कार्यालय, ता. मुळशी जि. पुणे या ठिकाणी रंगेहात पकडण्यात आले.

आरोपी लोकसेवक यांच्याविरूद्ध हिंजवडी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.